# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

पो. शिर्डी ता. राहाता जि. अहमदनगर पिन कोड नं. ४२३ १०९
दूरध्वनी क्रं. (०२४२३) २५८७७१/२५८७७२ फॅक्सः २५८७७०

जा.नं.एसएसएस/वशी-खरेदी/710 /२०२१
दिनांक : 3 JUN 2021

प्रति,
मे.-----------------------------------------------

-----------------------------------------------
-----------------------------------------------

-----------------------------------------------

विषयः-भाजीपाला... दरपत्रक मागणी..

आपणास कळविण्यात येते की, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करीता सोबत जोडलेले ४ तक्त्यांमधील नमूद भाजीपाल्याची खरेदी खालील अटी-शर्तीस अधीन राहून दरपत्रक पध्दतीने करावयाची आहे. त्यास अनुसरून आपण आपले दर सोबतचे तक्त्यांमध्ये भरून त्यावर सही शिक्का मारुन बंद पाकीटात संस्थानचे शिर्डी येथील सामान्य प्रशासन विभागाकडे विहित मुदतीत सादर करावेत.

अटी/शर्ती –

१. दरपत्रकासोबत अद्ययावत दुकान नोंदणी दाखला/कृषी उत्पन्न बाजार समिती परवाना/ ATMA (Agricultural Technology Management Agency) किंवा महाराष्ट्र राज्य कृषी विभाग पणन महामंडळ यांचेकडील नोंदणी प्रमाणपत्र/तत्सम शासकीय परवाना प्रत सादर करणे अनिवार्य राहील.
२. ज्या नावाने दरपत्रक सादर करावयाचे आहे त्या नावाने पॅन कार्ड प्रत सादर करणे अनिवार्य राहिल.
३. भाजीपाला पुरवठा करण्याचा कालावधी १ जून २०२१ ते ३० जून-२०२१, १ जुलै-२०२१ ते ३० सप्टेंबर-२०२१, १ ऑक्टोबर-२०२१ ते ३१ डिसेंबर-२०२१, १ जानेवारी-२०२२ ते ३१ मार्च-२०२२ असा राहिल. भाजीपाला संस्थानचे प्रसादालयात पोहच करावा लागेल.
४. प्रत्येक तिमाही कालावधीसाठी भरलेल्या आयटेम वाईज भाजीपाला दरांचा तुलनात्मकदृष्टया स्वतंत्रपणे विचार करण्यात येईल. दरपत्रकधारक कुठल्याही कालावधीसाठी दरपत्रक सादर करु शकतो. त्यातील न्युनतम दर विचारात घेऊन पुरवठा आदेश दिला जाईल. तथापि दरपत्रकधारकाने दर भरतांना काळजीपूर्वक भरावेत.

५. भाजीपाला दरपत्रकातील दर भरतांना तक्त्यामध्ये दिलेले मालाचे वर्णन, दर्जा, कालावधी, अटी–शर्ती, पुरवठा Schedule याचा विचार करावा. तसेच मार्केट सेस, तोलाई, मापाई, वाराई तसेच शिर्डी येथील संस्थानचे प्रसादालय विभागात भाजीपाला पोहचचा वाहतूक खर्च वगैरे सर्व खर्च समाविष्ट करुन, सर्व खर्चासह सोबतचे तक्त्यात प्रती किलोचे दर नमूद करावेत. त्यावर दरपत्रकधारकाने आपली सही करुन शिक्का मारावा.

६. प्रत्येक आठवडयात दोन वेळेस (गुरुवार व रविवार) अगर संस्थानचे धोरणानुसार गरजेप्रमाणे प्रसादालय विभागाकडून ३ दिवस अगोदर भाजीपाल्याची मागणी केली जाईल त्याप्रमाणे भाजीपाला पुरवावा लागेल.

७. प्रसादालयात पुरविणेत येणारा भाजीपाला स्वच्छ पोते व कॅरेटमध्ये, प्रवासात खराब होणार नाही अशी काळजी घेऊन त्या पद्धतीने पुरवावयाचा आहे. तसेच भाजीपाला धुताना स्वच्छ चांगल्या पाण्याचा वापर करावा.

८. भाजीपाला पुरवठा Food & Adulteration Act व शासन Food Safety Regulations प्रमाणे पुरविणे बंधनकारक राहील. याबाबत काही प्रसंग उद्भवल्यास ही संपूर्ण जबाबदारी संबंधित पुरवठाधारकाची राहील.

९. पुरविणेत येणारा भाजीपाला ताजा, स्वच्छ व चांगल्या दर्जाचा असावा. पुरवठा आदेशातील पुरवठा केलेला भाजीपाला कमी प्रतीचा आढळल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत पुरवठाधारकाची राहील. तसेच किड असलेला भाजीपाला स्विकारला जाणार नाही.

१०. भाजीपाला एक आयटेमचे बदली दुसरा भाजीपाला Item पुरविल्यास तो स्वीकारला जाणार नाही.

११. भाजीपाला पुरविलेवर संस्थानकडे बील सादर केलेनंतर साधारण १ महिन्यात बील आदा करण्याचा संस्थानचा प्रयत्न राहिल. सदर पुरवठयापोटी संस्थानकडून आगाऊ रक्कम (ॲडव्हान्स) दिली जाणार नाही.

१२. ज्यांचे दरपत्रक मंजूर होतील त्यांना विहीत मुदतीत भाजीपाल्याचा पुरवठा करावयाची हमी म्हणून पुरवठा आदेश एकूण रकमेच्या ३% इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून संस्थानकडे ठेवावी लागेल. दरपत्रक मंजूर झाल्याचे कळविलेनंतर त्वरीत सदर रकमेचा भरणा करावा लागेल. ही सुरक्षा अनामत रक्कम व्यवस्थितरित्या सदर भाजीपाल्याचा पुरवठा केलेनंतर परत केली जाईल. सुरक्षा अनामत रकमेवर कुठल्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

१३. ज्याचे दरपत्रक मंजूर होईल त्या पुरवठाधारकाला रु.१००/- मात्रचे स्टॅम्पवर संस्थानला करारनामा करुन देणे बंधनकारक राहील.

१४. दरपत्रकातील दर मंजूर झाल्यानंतर मंजूर दराने भाजीपाला पुरवठा करणे बंधनकारक आहे. मंजूर दरामध्ये कोणत्याही कारणास्तव भाववाढ मागण्याचा अधिकार पुरवठाधारकास असणार नाही अथवा अशा प्रकारची दरवाढ दिली जाणार नाही. पुरवठाधारकाने भाजीपाला पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा पुरवठा न केल्यास संस्थानला बाजारभावाने भाजीपाला खरेदी करावा लागल्यास याबाबत उचित कारवाई करण्यात येईल अगर याबाबत मा.तदर्थ समिती/ मा.व्यवस्थापन समिती/मा.उपसमिती/मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जो निर्णय घेतील तो पुरवठाधारकावर बंधनकारक राहील.

१५. संस्थानने नमूद केलेले कुठल्याही अटी-शर्तींचा भंग झाल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येऊन सदर पुरवठाधारकाचे नांव पुढील ३ वर्षासाठी काळया यादीत समावेश केले जाईल अगर याबाबत मा.तदर्थ समिती/ मा.व्यवस्थापन समिती/मा.उपसमिती/मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जो निर्णय घेतील तो पुरवठाधारकावर बंधनकारक राहील.

१६. शिर्डी येथे श्रींचे दर्शनासाठी येणा-या साईभक्तांच्या गर्दीवर सदर प्रसाद भोजनाची सेवा अवलंबून असल्यामुळे भाजीपाला मागणी दरपत्रकामध्ये अंदाजे नमूद करण्यात आलेली आहे. तथापी निविदा कालावधीत अगर त्यानंतरही पुढील खरेदी संबंधीत प्रक्रिया पूर्ण होईपावेतो आवश्यकतेनुसार मंजूर केलेल्या परिमाणापेक्षा २५ टक्केपर्यंत जादा भाजीपाल्याची मागणी संस्थानकडून झाल्यास त्या भाजीपाल्याचा पुरवठा मान्य दरानेच करणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहील.

१७. भाजीपाला पुरविणेचा आदेश प्रसंगी दूरध्वनीवरुन अथवा प्रसादालयाचे मागणी पत्रानुसार दिला जाईल. तथापि दिलेले Schedule प्रमाणे भाजीपाल्याचा पुरवठा न झाल्यास अगर योग्य प्रतीचा नसल्यामुळे तो नाकारला गेल्यास संस्थानची अडचण होऊ नये म्हणून, संस्थानला बाजारभावाने आवश्यक तितका किंवा दिलेल्या आदेशा इतका भाजीपाला कृषी उत्पन्न बाजार समितीमधून अगर बाजारातून खरेदी करण्याची मुभा राहील. अशा खरेदी केलेल्या भाजीपाल्यासाठी जादा लागलेल्या रकमेची (फरकाची) भरपाई पुरवठाधारकाने संस्थानला करुन दयावयाची आहे. सदरची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतून अगर पूर्वीच्या/नंतरच्या आलेल्या भाजीपाल्याच्या बिलातून वसूल करण्याचा अधिकार संस्थानला राहील.

१८. पुरवठा कालावधीमध्ये एखादी आपत्ती/ नैसर्गिक आपत्तीमुळे (अशी आपत्ती की जी पुरवठाधारकांच्या नियंत्रणाबाहेर असेल. उदा.युद्ध, अतिवृष्टी, दुष्काळ, अपहरण, घातपात, रोगराई, संप, स्फोट, टाळेबंदी, भूकंप वगैरे) पुरवठाधारक भाजीपाल्याचा पुरवठा करु शकला नाही व तसे पुरवठाधारकाने संस्थानला त्वरीत लेखी कळविले तर याबाबत योग्य तो निर्णय परिस्थितीनुरुप घेण्यात येईल. तथापि सदर तरतूद ही फक्त पुरवठा करण्यात झालेला विलंब क्षमापित करण्याइतपत मर्यादित असून उपरोक्त परिस्थितीत मंजूर दरापेक्षा बाजारात भाववाढ झाल्यास त्यासाठी लागू राहणार नाही. पुरवठादाराला बाजारात भाववाढ झाली तरीही मंजूर दराने पुरवठा करणे बंधनकारक आहे. पुरवठादाराने पुरवठा न केल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल अगर मा.व्यवस्थापन समिती/मा.उपसमिती/मा.तदर्थ समिती/मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय जो निर्णय घेतील तो पुरवठाधारकावर बंधनकारक राहील. याबाबत संबंधिताची कुठलीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.

१९. पुरवठाधारकाने पुरविलेला भाजीपाला संस्थानने नाकारला व त्यामुळे संस्थानला बाजारभावाने कृषी उत्पन्न बाजार समितीमधून खरेदी करावे लागल्यास त्यासाठी जादा आलेल्या खर्चाची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतुन अथवा संस्थानकडून देय असलेल्या भाजीपाल्याच्या बिलातुन वसूल केली जाईल.

२०. पुरवठा आदेशातील भाजीपाला मुदतीत पुरविला नाही तर खालीलप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

| | |
|---|---|
| अ) पुरवठा न केलेल्या भाजीपाल्याची किंमत रु.२.०० लाखांपेक्षा कमी असल्यास | प्रती आठवडा ०.५ % दराने जास्तीत जास्त १० % पर्यंत |
| ब) पुरवठा न केलेल्या भाजीपाल्याची किंमत रु.२.०० लाख किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास | प्रती आठवडा ०.५ % दराने जास्तीत जास्त ५ % पर्यंत |

२१. सदर दरपत्रक मागणीमध्ये संस्थानची मागणी अंदाजित आहे. त्यामुळे शिर्डी येथे प्रसादालयामध्ये प्रसादभोजन घेणारे साईभक्तांचे गर्दीनुसार भाजीपाल्याची मागणी नोंदवून भाजीपाला खरेदी केला जाईल. पुरवठा आदेशात नमूद केलेला सर्व भाजीपाला खरेदी करणे संस्थानवर बंधनकारक नाही.

२२. कोणतेही दरपत्रक अंशत:/पूर्णत: स्वीकारणे अथवा नाकारणे अगर सर्व दरपत्रके नाकारणे याबाबतचा अधिकार संस्थानने राखून ठेवला आहे. त्याची कारणे देणे संस्थानवर बंधनकारक राहाणार नाही

२३. सीलबंद पाकिटातील दरपत्रक संस्थानचे सामान्य प्रशासन शाखेतील आवक विभागामध्ये विहित मुदतीत जमा करावेत. पाकिटावर " **भाजीपाला खरेदी दरपत्रक**" असा स्पष्ट उल्लेख असावा. मुदतीनंतर आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

२४. दरपत्रक मंजूर झालेनंतर चांगल्या दर्जाचा भाजीपाला पुरवावा लागेल. खराब भाजीपाला स्वीकारला जाणार नाही. अशा भाजीपाल्याचा पुरवठा झाल्यास तो स्वखर्चाने तात्काळ परत घेऊन जाणे पुरवठादारावर बंधनकारक राहील. तो न नेल्यास, त्याची नासधूस झाल्यास त्यास संस्थान जबाबदार राहणार नाही.

२५. संस्थानचे प्रसादालयातील पर्यवेक्षक/आचारी पुरवठा आदेश दिलेले वर्णनाप्रमाणे भाजीपाल्याची तपासणी करतील व ताब्यात घेतील. भाजीपाला स्विकारणेबाबत अधिक्षक, प्रसादालय यांचा निर्णय अंतिम राहील.

२६. सदरील व्यवहराबाबत वाद निर्माण झाल्यास तो राहाता/कोपरगाव न्यायालयाचे न्यायकक्षेत राहील.

२७. दरपत्रक सादर करण्याचा अंतिम दिनांक १८ / ०६ /२०२१.

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

सोबत- दर भरण्यासाठी दरपत्रक तक्ते

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

## जून २०२१ करिता भाजीपाला खरेदी दरपत्रक तक्ता

| अ.नं. | मालाचा तपशील | मागणी किलो | दर प्रती किलो सर्व समावेशक खर्चासह | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | कोथिंबीर -चांगल्या प्रतिची, गावरान | ५८५ | | |
| २ | कढीपत्ता -चांगल्या प्रतिचा | ४२० | | |
| ३ | आळुपाने -चांगल्या प्रतिचे , गावरान | १३५ | | |
| ४ | शेवगा शेंगा-चांगल्या प्रतिचा , गावरान | २५ | | |
| ५ | मेथी भाजी -चांगल्या प्रतिची , गावरान | १७ | | |
| ६ | काकडी -चांगल्या प्रतिची , गावरान | ८५ | | |
| ७ | बीट -चांगल्या प्रतिचा | २ | | |
| ८ | तोंडले - चांगल्या प्रतिचे | ५ | | |
| ९ | हिरवा वटाणा | ८३५ | | |

दरपत्रकधारकाची सही व शिक्का

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

## जुलै - २०२१ ते सप्टेंबर २०२१ करिता भाजीपाला खरेदी दरपत्रक तक्ता

| अ.नं. | मालाचा तपशिल | मागणी किलो | दर प्रती किलो सर्वसमावेशक खर्चासह | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | कोथिंबीर -चांगल्या प्रतिची, गावरान | १७५० | | |
| २ | कढीपत्ता -चांगल्या प्रतिचा | १२५० | | |
| ३ | आळुपाने -चांगल्या प्रतिचे , गावरान | ४०० | | |
| ४ | शेवगा शेंगा-चांगल्या प्रतिचा , गावरान | ७५ | | |
| ५ | काकडी -चांगल्या प्रतिची , गावरान | २५० | | |
| ६ | बीट -चांगल्या प्रतिचा | ६ | | |
| ७ | तोंडले - चांगल्या प्रतिचे | १३ | | |
| ८ | हिरवा वाटाणा | २५०० | | |

दरपत्रकधारकाची सही व शिक्का

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

## ऑक्टोबर ते डिसेंबर २०२१ करिता भाजीपाला खरेदी दरपत्रक तक्ता

| अ.नं. | मालाचा तपशील | मागणी किलो | दर प्रती किलो सर्व समावेशक खर्चासह | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | कोथिंबीर -चांगल्या प्रतिची, गावरान | १७५० | | |
| २ | कढीपत्ता -चांगल्या प्रतिचा | १२५० | | |
| ३ | आळुपाने -चांगल्या प्रतिचे , गावरान | ८०० | | |
| ४ | शेवगा शेंगा-चांगल्या प्रतिचा , गावरान | ७५ | | |
| ५ | काकडी -चांगल्या प्रतिची , गावरान | २५० | | |
| ६ | बीट -चांगल्या प्रतिचा | ६ | | |
| ७ | तोंडले - चांगल्या प्रतिचे | १३ | | |

दरपत्रकधारकाची सही व शिक्का

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

## जानेवारी-२०२२ ते मार्च २०२२ करिता भाजीपाला खरेदी दरपत्रक तक्ता

| अ.नं. | मालाचा तपशील | मागणी किलो | दर प्रती किलो सर्व समावेशक खर्चासह | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | कोथिंबीर -चांगल्या प्रतिची, गावरान | १७५० | | |
| २ | कढीपत्ता -चांगल्या प्रतिचा | १२५० | | |
| ३ | आळुपाने -चांगल्या प्रतिचे , गावरान | ४०० | | |
| ४ | शेवगा शेंगा-चांगल्या प्रतिचा , गावरान | ७५ | | |
| ५ | मेथी भाजी -चांगल्या प्रतिची , गावरान | ५० | | |
| ६ | काकडी -चांगल्या प्रतिची , गावरान | २५० | | |
| ७ | बीट -चांगल्या प्रतिचा | ७ | | |
| ८ | तोंडले - चांगल्या प्रतिचे | ११ | | |
| ९ | गवार शेंगा - गावरान | ५ | | |
| १० | दोडके - चांगल्या प्रतीचे | १२५० | | |

दरपत्रकधारकाची सही व शिक्का